अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ (गणेश सिद्रामअप्पा खराडे) यांचा उलटतपास गैरअर्जदार क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्री. बारबोले -

१. हे म्हणणे खरे आहे की, मला कलम ४, ६ व ९ च्या नोटीसा प्राप्त झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, मला शासनामार्फत अंतिम निवाडा झाल्यानंतर पैसे उचलण्याची नोटीस मिळाली. माझ्या शपथपत्रातील मजकुर की कलम १२ (२) ची नोटीस दि. ११.०१.२०१० रोजी मिळाली हा बरोबर आहे. त्यावेळेस किती मावेजा मिळाला होता हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या वेळेस जो मावेजा मिळाला तो त्यावेळेसच्या बाजार भावाप्रमाणे बरोबर होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आम्ही मावेजा खुशीने उचलला. नाराजीने मावेजा उचलण्याबाबत आम्ही अर्ज दिला होता. तो अर्ज मी दाखल करू शकतो. मी वाढीव मावेजा १,००,०००/- (एक लाख) रुपयांच्या हिशोबाने मागितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो भाव मी अंदाजाने मागितलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जमिनीचा भाव १,००,०००/- (एक लाख) रुपये होता या संदर्भाने माझेकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी जे कागदपत्र दाखल केलेले आहे ते कागदपत्र त्या वेळेस भूसंपादन अधिकारी यांचेकडे दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन कोरडवाहु होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस माझी जमिन संपादन झाली, त्यावेळेस सातबारा उता-यावर विहिरीची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, विहिर निवाडा झाल्यानंतर केली. माझ्या जमिनीमध्ये ऊस, भाजीपाला हे पीक होती. मी ऊसाच्या पावत्या दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, आमची जमीन ही पंधरा वीस फुट काळ्यामातीची असल्याचे परिक्षण केले नव्हतो. मी परिक्षण अहवाल न्यायालयात दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे गाव होर्टी लहान आहे. आमच्या जमिनीचा गट क्र. ५०४ असा आहे. माझी केवळ जमीनच संपादीत झालेली आहे बाकी काही संपादीत झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जात मी झाडांच्या बाबतीत जी मागणी केली आहे ती खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी व नंदकुमार पोकलवार यांची ओळख नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की, मी त्यांच्याकडुन मुल्यांकन करून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, नंदकुमार पोकलवार आमच्या जमीनीचे मुल्यांकन करण्याकरीता दि. २६.११.२००९ रोजी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जे विहिरीचे मुल्यांकन मागितले आहे ते

अंदाजाने मागितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या निकालामधील जमीन व माझ्या जमिनीमध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या जमिनीची व माझ्या संपादीत झालेल्या जमिनीची प्रतवारी वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा अर्ज मुदतीमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या वेळेस मी अर्ज दाखल केला होता त्यावेळेस मी कोर्ट फीस दाखल केली नव्हती. मी कोर्ट फीस सन २०२२ साली दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी कोर्ट फीस न दिल्यामुळे भूसंपादन अधिकारी यांनी तो अर्ज प्रलंबीत ठेवला. हे म्हणणे खरे नाही की, १२ वर्षाच्या विलंबाकरीता मी जबाबदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेर तपास नाही.

गैरअर्जदार क्र.१ व २ यांचे वकीलांनी सदरचा उलटतपास स्वीकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत

AWASEKAR SWATI DILIPRAO
Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2025.10.30 14:42:19 +0530

दिनांकः २९.१०.२०२५

(श्रीमती. एस. डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश, व स्तर, तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P. D.F. file judgment /order/issues /evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge, Senior Division, Tuljapur, District -Dharashiv. |
| Date | --- | 29/10/2025 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 29/10/2025 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 30/10/2025 |